# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन, ई-स्क्वेअर जवळ,
अशोक नगर, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-६९०६७९००, ६९०६७९१८
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in


जा.क्र.झोपुप्रा/जनसंपर्क/३/३७१८-४/२०२६ दि.१९ ऑगस्ट, २०२६

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड, पुणेची "यशोगाथा" (Success Story) माहितीपट निर्मितीसाठी अनुभवी संस्थेची नियुक्तीसाठी दरपत्रक मागविण्याची सूचना

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड, पुणे यांच्या विविध योजना, प्रकल्प व पुनर्वसनाच्या कामांमधून लाभार्थ्यांच्या जीवनात झालेला सकारात्मक बदल प्रभावीपणे जनतेसमोर मांडण्यासाठी **"यशोगाथा (Success Story)"** माहितीपट निर्मिती करण्यासाठी अनुभवी व सक्षम संस्थेची नियुक्ती करणे प्रस्तावित आहे.

### १. कामाचा व्याप्ती

निवड झालेल्या संस्थेमार्फत खालीलप्रमाणे कामे करणे अपेक्षित आहे :

१. संकल्पना व पटकथा तयार करणे.
२. मराठी भाषेत निवेदन (Narration) तयार करणे.
३. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या योजनांचे चित्रिकरण करणे.
४. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचे लघु संदेश तयार करणे.
५. झोपडीधारकांच्या अनुभवावर आधारित मुलाखती तयार करणे.
६. ५ मिनिटांची माहितीपटाच्या माध्यमातून यशोगाथा तयार करणे.
७. आवश्यकतेनुसार संबंधित कामाची Soft Copy तयार करून सादर करणे.

### २. पात्रता व आवश्यक अटी

१. संस्थेकडे वैध GST नोंदणी व आयकर नोंदणी असणे आवश्यक राहील.
२. संस्थेचे वैध नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
३. संस्था शासनामार्फत सूचिबद्ध / Empanelled असल्यास त्याचा पुरावा सादर करावा.
४. चित्रिकरण व आवाजाची गुणवत्ता उत्तम प्रतीची असणे आवश्यक राहील.
५. आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ व आधुनिक उपकरणे संस्थेकडे उपलब्ध असणे आवश्यक राहील.
६. प्रस्तावासोबत मागविलेली सर्व आवश्यक परिपुर्ण कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.
७. माहितीपटाच्या कामाची **Soft Copy** कार्यालयात वेळेत सादर करणे आवश्यक राहील. Soft Copy सादर केल्याशिवाय देयकाची कार्यवाही केली जाणार नाही.

८. संस्थेने यापूर्वी केलेल्या समान स्वरूपाच्या कामांचा अनुभव प्रमाणपत्रांसह सादर करावा.
९. प्राधिकरणास आवश्यकतेनुसार कामाच्या स्वरूपात बदल / सुधारणा सुचविण्याचा अधिकार राहील.
१०. अंतिम तयार केलेली सामग्री प्राधिकरणाच्या मान्यतेनंतरच वापरण्यात येईल.

## ३. सादर करावयाची कागदपत्रे

संस्थेने तांत्रिक प्रस्तावासोबत खालील कागदपत्रे सादर करावीत :

१. संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र
२. GST प्रमाणपत्र
३. PAN / आयकर नोंदणी प्रमाणपत्र
४. संबंधित क्षेत्रातील अनुभव प्रमाणपत्रे
५. यापूर्वी केलेल्या समान स्वरूपाच्या कामांची यादी
६. Portfolio / Sample Work
७. उपलब्ध मनुष्यबळाची माहिती
८. उपलब्ध तांत्रिक साधने व उपकरणांची माहिती
९. प्रस्तावित कार्यपद्धती व Work Plan
१०. अधिकृत प्रतिनिधीचे प्राधिकृत पत्र
११. इतर आवश्यक कागदपत्रे

## ४. निवड प्रक्रिया

सदर कामासाठी संस्थेकडून **तांत्रिक प्रस्ताव** (Technical Proposal) व **आर्थिक प्रस्ताव** (Financial Proposal) मागविण्यात येत असून, संस्थेची निवड QCBS (Quality and Cost Based Selection) पद्धतीने करण्यात येईल.

## ५. तांत्रिक मूल्यमापन निकष

| अ.क्र. | निकष | कमाल गुण |
|---|---|---|
| १ | संस्थेचा संबंधित क्षेत्रातील अनुभव | २० |
| २ | यापूर्वी केलेल्या यशोगाथा / माहितीपट / चित्रिकरण कामांचा अनुभव | २० |
| ३ | संस्थेचे Portfolio व कामाची गुणवत्ता | १५ |
| ४ | उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळ व उपकरणांची क्षमता | १५ |
| ५ | सादर केलेली कार्यपद्धती व कामाचे नियोजन (Methodology & Work Plan) | १५ |
| ६ | संकल्पना, पटकथा व सर्जनशीलतेचे सादरीकरण | १५ |
| | एकूण | १०० |

तांत्रिक मूल्यमापनामध्ये किमान [७०] गुण प्राप्त करणाऱ्या संस्थांच्याच आर्थिक दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

Technical Evaluation Sheet (एकूण १०० गुण)

खाली सोशल मीडिया हँडलिंगसाठी संस्थेची निवड करण्याकरिता १०० गुणांचे सविस्तर Technical Evaluation Sheet नुसार गुण देण्यात येतील.

| अ.क्र. | मूल्यमापनाचा निकष | गुणांचे विभाजन | कमाल गुण |
|---|---|---|---|
| १ | संस्थेचा संबंधित क्षेत्रातील अनुभव | ३ ते ५ वर्षे (५ गुण)<br>५ ते ७ वर्षे (१० गुण)<br>७ ते १० वर्षे (१५ गुण)<br>१० वर्षांपेक्षा अधिक (२० गुण) | २० |
| २ | यापूर्वी केलेल्या यशोगाथा / माहितीपट / चित्रिकरण कामांचा अनुभव | १ ते २ कामे (५ गुण)<br>३ ते ५ कामे (१० गुण)<br>६ ते १० कामे (१५ गुण)<br>१० पेक्षा अधिक कामे (२० गुण) | २० |
| ३ | संस्थेचे Portfolio व कामाची गुणवत्ता | चित्रिकरणाची गुणवत्ता (४<br>Editing व Post Production (३ गुण)<br>Storytelling/Presentation (३ गुण)<br>Sound/Voice Over/Music (२ गुण)<br>Graphics/Animation/Subtitles (३ गुण) | १५ |
| ४ | उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळ व उपकरणांची क्षमता | अनुभवी Videographer/Cinematographer (४ गुण)<br>Video Editor/Post Production Team (३ गुण)<br>Script Writer/Creative Team (२ गुण)<br>Sound/Voice Over सुविधा (२ गुण)<br>Professional Camera/Lighting/Audio Equipment (२ गुण)<br>Drone/इतर आधुनिक उपकरणे (२ गुण) | १५ |
| ५ | सादर केलेली कार्यपद्धती व कामाचे नियोजन (Methodology & Work Plan) | Pre-Production Plan (३ गुण)<br>Concept & Story Development (३ गुण)<br>Production/Shooting Plan (३ गुण)<br>Post-Production Plan (३ गुण)<br>Time Schedule & Quality Control (३ गुण) | १५ |
| ६ | संकल्पना, पटकथा व सर्जनशीलतेचे सादरीकरण | विषयाची समज व मांडणी (३ गुण)<br>संकल्पनेची परिणामकारकता (३ गुण)<br>पटकथेची गुणवत्ता (३ गुण)<br>सर्जनशीलता व नाविन्यपूर्णता (३ गुण)<br>लाभार्थ्यांच्या जीवनातील सकारात्मक बदल प्रभावीपणे मांडण्याची क्षमता (३ गुण) | १५ |
| | | एकूण गुण | १०० |

६. आर्थिक दरपत्रक

संस्थेने खालील बाबींचे दर स्वतंत्रपणे सादर करावेत-

| अ.क्र. | सेवेचा प्रकार | दर ₹ | GST ₹ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | संकल्पना व पटकथा तयार करणे. | | | |
| २ | मराठी भाषेत निवेदन (Narration) तयार करणे. | | | |
| ३ | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या योजनांचे चित्रिकरण करणे. | | | |
| ४ | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचे लघु संदेश तयार करणे. | | | |
| ५ | झोपडीधारकांच्या अनुभवावर आधारित मुलाखती तयार करणे. | | | |
| ६ | मिनिटांची माहितीपटाच्या माध्यमातून यशोगाथा तयार करणे. | | | |
| ७ | आवश्यकतेनुसार संबंधित कामाची Soft Copy तयार करून सादर करणे. | | | |
| | एकूण | | | |

टीप: लागू असलेले GST व इतर कर स्वतंत्रपणे नमूद करावेत.

७. दरपत्रक सादर करण्याच्या अटी

१. दरपत्रक दिनांक २८/०८/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत सादर करावे.
२. तांत्रिक प्रस्ताव व आर्थिक दरपत्रक स्वतंत्र पाकिटात/लिफाफ्यात सादर करावे.
३. उशिरा प्राप्त झालेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.
४. अपूर्ण कागदपत्रे असलेले प्रस्ताव अपात्र ठरविण्यात येऊ शकतात.
५. कार्यालयास कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार राहील.
६. संस्थेच्या निवडीसाठी गुणवत्ता व खर्च आधारित निवड (QCBS) पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. तांत्रिक निविदेला ७०% आणि आर्थिक निविदेला ३०% वजन देण्यात येईल.
७. तांत्रिक मूल्यांकनासाठी संस्थेस एकूण १०० गुणांपैकी गुण देण्यात येतील. एकूण किमान ७० गुण (७०%) प्राप्त करणारे निविदादार तांत्रिकदृष्ट्या पात्र मानले जातील.
८. अंतिम तांत्रिक गुण (FTS) = निविदादारास प्राप्त तांत्रिक गुण X (७०/१००)
९. तांत्रिकदृष्ट्या पात्र संस्थांपैकी सर्वात कमी आर्थिक दर (Lowest Commercial Quote) देणाऱ्या निविदादारास आर्थिक मूल्यांकनामध्ये १०० गुण देण्यात येतील आणि त्याच्या आर्थिक गुणांना ३०% वजन दिले जाईल.
१०. अंतिम आर्थिक गुण (FCS) = ((सर्वात कमी आर्थिक दर / संबंधित निविदादाराचा आर्थिक दर) X १००) X (३०/१००)
११. तांत्रिक व आर्थिक गुणांचे ७०:३० या प्रमाणात एकत्रित मूल्यांकन करण्यात येईल.
१२. एकूण गुण (Combined Technical & Financial Score) = FTS + FCS

१३. वरील मूल्यांकनानुसार १०० पैकी सर्वाधिक एकूण गुण प्राप्त करणाऱ्या संस्थेचे दरपत्रक सर्वोत्तम मूल्यांकित दरपत्रक (Best Evaluated Quatation) म्हणून ग्राह्य धरली जाईल.

१४. दोन किंवा अधिक संस्थेंचे समान सर्वाधिक एकूण गुण मिळाल्यास, अधिक तांत्रिक गुण प्राप्त करणाऱ्या संस्थेस वाटाघाटीसाठी प्रथम आमंत्रित केले जाईल.

१५. राज्य मंडळ सर्वोत्तम मूल्यांकित निविदा किंवा कोणतीही दरपत्रक स्वीकारण्यास बांधील राहणार नाही. कोणतीही दरपत्रक पूर्णतः किंवा अंशतः स्वीकारण्याचा अधिकार राज्य मंडळाकडे राहील.

१६. निवड झालेल्या संस्थेसोबत करार करण्यात येईल.

१७. कराराचा कालावधी [१ वर्ष] राहील व काम समाधानकारक असल्यास नियमानुसार मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

१८. अंतिम निवड ही केवळ कमी दरावर न करता तांत्रिक गुणवत्ता, अनुभव, क्षमता व आर्थिक दर यांचा एकत्रित विचार करून करण्यात येईल.

१९. संस्थेने सादर केलेल्या माहितीची आवश्यकतेनुसार पडताळणी करण्यात येईल.

२०. अनुभव, Work Orders आणि Portfolio याबाबत खोटी/अपूर्ण माहिती आढळल्यास प्रस्ताव अपात्र ठरविण्याचा अधिकार कार्यालयास ठेवावा.

२१. कामाची गुणवत्ता समाधानकारक नसल्यास करारातील अटींनुसार कारवाई करण्यात येईल.

१९/८/२०२६

दिनांक : १९/०८/२०२६
ठिकाण : पुणे

**सतीशकुमार खडके (भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे**